ISSN 2229-7553

# JOURNAL OF ADVANCE PUBLIC ADMINISTRATION

VOL.No. V September 2015 - February 2016

Research Center of Public Administration
DEGLOOR COLLEGE , DEGLOOR
Dist-Nanded - 431717 (Maharashtra) India
www.degloorcollege.ac.in

Journal of Advance Public Administration is Published by Research Center of Public Administration, Degloor Collage, Degloor,Maharashtra. The Journal aims at promoting study and Research in Public Administration. The Views expressed in the Articles/Research papers published in the Journal are those of authors and the Publisher/Editor does not hold itself responsible for them.

**JOURNAL OF ADVANCE PUBLIC ADMINISTRATION**

# EDITORIAL BOARD

**Dr. Ashok M. Wakodkar**
Publisher / Editor
Principal, Degloor Collage, Degloor

**Dr. Balaji R. Katturwar**
Executive Editor
Degloor Collage, Degloor

## Members

**Dr. Renu Kapila**
Head, Department of Public Administration
Panjabi University,
Patiala, (Punjab)

**M. Veera Prasad**
Sri Krishnadevaraya University
Anantapur (Andhra Pradesh)

**G. Parvathi**
Yogi Vemana University, Kadapa (A.P.)

**Dr. Parasmal Bora**
H.O.D. (Retd.) Pub. Adm.
Dr. B.A.M. University
Aurangabad (M.S.)

**Dr. M.C. Pawar**
Associate Professor,
Dr. B.A.M. University, Aurangabad (M.S.)

**Dr. Panchshil Ekambekar**
Chairman, B.O.S.Pub.Adm.
S.R.T.M. University, Nanded.

CONTENTS

Pa

15) **Participation Of People In Popular Programmes In India** — Dr. Anjanayya R.Bistee

16) **Women – Social Movements And Indian States** — Dr. Ravinder Gunti

17) **Analyzing Implementation Of Rajiv Gandhi Scheme For Empowerment Of Adolescent Girls In Punjab** — Daljit Kaur

18) **Delivering Environmental Justice: Perspective, Mitigations, And New Challenges In India** — Dr. Mohan Das. K,

19) लोप पावत चाललेली कार्यसंस्कृती : एक चिंतनीय बाब ! — प्राचार्य, डॉ.अशोक वाकोडकर

20) पर्यावरणाचे महत्त्व व व्यवस्थापन — डॉ.प्रतिभा उन्हाळे,

21) लोकप्रशासनातील कार्यक्षमता व माहितीचा अधिकार — डॉ. बी.आर.कत्तूरवार

22) मानवी विकासात आरोग्याचे महत्त्व — प्रा.संजय देबडे

# २१) लोकप्रशासनातील कार्यक्षमता व माहितीचा अधिकार

डॉ. बी.आर.कत्तूरवार
देगलूर महाविद्यालय, देगलूर

## माहिती अधिकार कायद्याचा अर्थ :-

सर्वसाधारणपणे शासकीय व निमशासकीय कार्यालयातून नागरीकांस आवश्यक असलेली माहिती व आकडेवारी प्राप्त करण्यासाठी नागरीकांस मिळालेला अधिकार म्हणजेच माहितीचा अधिकार होय. माहिती अधिकारास इंग्रजीमध्ये Information असे म्हणतात. इन्फारमेशन हा मुळ शब्द लॅटीन भाषेतील आसून त्याचा अर्थ कशाला तरी निश्चित आकार देणे, एक रीत निर्माण करणे असा होतो. तसेच या इन्फारमेशन शब्दाचा अर्थ पाहतांना आपल्या ज्ञानासाठी आणि संदीग्धता दूर करण्यासाठी नवीन निर्मिती करणे असा अर्थ निघतो. इन्फारमेशन ला मराठीमध्ये 'माहिती' असे म्हणतात. तर शासकीय कार्यालयातील माहितीचा अधिकार म्हणजे कोणत्याही सार्वजनिक प्राधीकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेली आणि माहितीच्या अधिकारानुसार प्राप्त करता येण्यालायक असलेली माहिती मिळविण्याचा अधिकार म्हणजेच माहितीचा अधिकार होय. शासकीय कार्यालयातील दस्ताऐवज, प्रमाणपत्र, अर्ज, खर्चाच्या पावत्या, इलेक्ट्रानीक साधनसामुग्री, ईमेलवरील संदेश, परीपत्रक इ. माहिती नागरीकांस या अधिकारानुसार प्राप्त करता येते. केवळ देशाच्या सुरक्षीतेच्या दृष्टीने आणि लष्कर विषयक माहिती नागरीकांस या कायद्यानुसार प्राप्त करता येत नाही.

नागरीकांस एखाद्या शासकीय कार्यालयाकडून माहिती प्राप्त करण्यासाठी विशिष्ट नमुन्याचा फॉर्म भरुन त्यावर १० रुपयाचा कोर्ट फीस स्टॅम्प लावावा लागतो आणि कार्यालयातील माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज द्यावा लागतो. संबंधीत माहिती अधिकाऱ्यास अर्ज केलेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत माहिती पुरावी लागते. अन्यथा त्या माहिती अधिकाऱ्याला दंड आकारला जातो. थोडक्यात प्रशासनामध्ये कार्यक्षमता निर्माण करण्यासाठी, भ्रष्टाचार कमी करण्यासाठी आणि पारदर्शकता आनण्यासाठी माहितीचा अधिकार ही काळाची गरज बनली आहे.

## • माहितीच्या अधिकाराचा भारतीय प्रशासनावरील परीणाम :-

नागरीकांना माहितीच्या अधिकाराचा हक्क दिल्यामुळे प्रत्येक देशातील नागरीक जागरुक झाले. आहेत. प्रशासनातील जनतेचा पैसा योग्य कामासाठी खर्च झाला पाहिजे, नागरीकांचे प्रशासकीय कामे वेळेच्या आत पूर्ण झाले पाहिजेत, या उद्देशाने सकारात्मक परीवर्तन माहितीच्या अधिकारामुळे झाले आहे. त्याचे विश्लेषण खालील मुद्दयाच्या आधारे देता येते.

### १) जनतेला आवश्यक ती माहिती मिळू लागली आहे :-

माहितीचा अधिकार कायद्यामुळे सर्वसामान्य नागरीकांना प्रशासकीय कार्यालयातून आवश्यक असलेली माहिती सहज प्राप्त करता येऊ लागली आहे. शासकीय कार्यालयातील जमा-खर्च, शासकीय परिपत्रक, पावत्या, परवाने इ. बाबी नागरीकांना सहज प्राप्त करता येऊ लागले आहे. जर प्रशासनातील भरती प्रक्रियेत पात्र उमेदवाराला डावलून पक्षपातीपणे

अपात्र उमेदवारांची निवड केल्यास अन्यायग्रस्त उमेदवार संबंधित भरती प्रक्रिये कागदपत्रे माहिती कायद्यांतर्गत प्राप्त करुन न्यायालयाकडे दाद मागू शकतो. त्यामुळे भरती प्रक्रियेतील गैरप्रकारांना आळा बसला आहे.

## २) अधिकाऱ्यामध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण झाली :-

माहितीच्या अधिकारापूर्वी प्रशासनातील कांही अधिकारी-कर्मचारी बेजबाबदारपणे कार्य करीत होते. अशा अधिकाऱ्यांना कर्तव्यपालन करण्यास भाग पाडण्याचे कार्य माहिती अधिकार कायद्यामुळे झाले आहे. आपण जर आपल्या कर्तव्याचे पालन केलो नाही तर भविष्यात आपला कार्य अहवाल माहिती अधिकारातून मागवीला जाईल या भितीपोटी प्रशासकीय अधिकारी कार्यक्षमपणे कार्य करु लागले आहेत.

## ३) नवीन प्रशासकीय यंत्रणेची निर्मिती :-

माहिती अधिकाराची आमलबजावणी करण्यासाठी केंद्रस्तरावर, राज्यस्तरावर विविध प्रशासकीय पदे निर्माण करण्यात आली आहेत. या कायद्यानुसार प्रत्येक प्रशासकीय कार्यालयाच्या समोर माहिती अधिकाराचा फलक लावणे अनिवार्य असून सहाय्यक माहिती अधिकारी, अपीलीय माहिती अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. देशपातळीवर केंद्रीय माहिती आयोग व राज्य पातळीवर राज्य माहिती आयोग या कायद्याच्या प्रभावामुळे स्थापन करण्यात आला आहे. प्रत्येक प्रशासकीय कार्यालयात नागरिकांस माहिती पुरविण्यासाठी एका अधिकाऱ्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## ४) प्रशासकीय भ्रष्टाचाराला आळा :-

माहितीच्या अधिकारापूर्वी बहुतांश प्रशासकीय कार्यालयात उघडपणे भ्रष्टाचार केला जात होता. परंतु माहितीच्या अधिकारामुळे प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यावर बऱ्याच प्रमाणात अंकुश बसला आहे. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे अधिकाऱ्याच्या मनात अशी भिती निर्माण झाली आहे की, आपण भ्रष्टाचार केल्यास भविष्यात एखादा नागरीक माहितीच्या अधिकाराखाली तो भ्रष्टाचार उघडकीस आणेल या भितीपोटी प्रशासनातील भ्रष्टाचाराला आळा बसत आहे. प्रशासनातील कोणतीही वस्तू खरेदी विक्री करतांना काळजी घेतली जात आहे. माहितीच्या अधिकार कायद्यामुळे भ्रष्टाचार पूर्णत: नष्ट झाला नसला तरी निश्चित भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी झाले आहे.

## ५) नागरीकांमध्ये जागरुकता :-

माहिती अधिकारामुळे आता सुशिक्षीत, अशिक्षीत, शहरी व ग्रामीण असे सर्व स्तरावरील नागरिक आपल्या हक्काबाबत जागरुक झाले आहेत. सर्वसामान्य नागरीक देखील आपल्याला आवश्यक असलेली माहिती मिळविण्यासाठी विविध प्रशासकीय कार्यालयात माहिती अधिकाराचा अर्ज करीत आहेत. सारांश या कायद्यामुळे नागरिकांना आपल्या हक्क व कर्तव्याची जाणीव झाली आहे.

## ६) प्रशासकीय मुल्यांना महत्त्व :-

लोकप्रशासनातील अधिकारी – कर्मचारी मुल्यसापेक्ष राहून जनहीताची कामे केली पाहिजेत तसेच मानवी मुल्याचे संवर्धन केले पाहिजे हा उद्देश माहिती अधिकारामुळे बऱ्याच प्रमाणात साध्य होऊ लागला आहे.

## ७) सुशासनाच्या निर्मितीस प्रोत्साहन :-

शासन व प्रशासनाद्वारे जनतेला चांगल्या सुविधा कमी खर्चात, कमी वेळेत व कमी श्रमात उपलब्ध व्हाव्यात हा सुशासनाचा उद्देश आहे. तो उद्देश साध्य करण्यासाठी माहिती अधिकाराचा कायदा प्रभावी ठरलाआहे. या कायद्यामुळे जनतेला आवश्यक असलेल्या सुविधा प्रशासनामार्फत पुरविल्या जात आहेत. म्हणजेच सुशासनाची निर्मीती होत आहे.

## ८) लोकहीतास प्राधान्य :

लोकप्रशासनातील अधिकारी कर्मचारी लोकहीताला प्राधान्य देवून कार्य करणे अपेक्षीत असते. परंतु बऱ्याच वेळेस अधिकारी वर्ग स्वार्थी हेतूने लोकहीताकडे दुर्लक्ष करीत असत. माहिती अधिकाराच्या प्रभावामुळे प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याला कोणतेही कार्य करतांना लोकहीत पाहून व कायद्याच्या चौकटीत राहून कार्य करावे लागते. थोडक्यात माहिती अधिकारामुळे सामान्य जनतेला न्याय मिळू लागले आहे.

## ९) आंतरराष्ट्रीय स्तरावर अनुकूल वातावरण :-

एकविसाव्या शतकात भारतासह बहुतांश राष्ट्रामध्ये नागरीकांना माहितीचा अधिकार दिला पाहिजे या विचारास अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. आज जवळपास ५० ते ५५ राष्ट्रांमध्ये माहितीचा अधिकार कायदा संमत झाला असून नागरीकांना आवश्यक असणारी माहिती सहजप्राप्त होऊ लागली आहे.

थोडक्यात माहितीचा अधिकार कायद्यामुळे प्रशासन व्यवस्थेत एकप्रकारची सकारात्मक क्रांती झाली असून त्यामूळे प्रशासकीय कार्यालयात देखील सुधारणा घडून आली आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांना आपले कर्तव्य पार पाडण्यास भाग पाडले जात आहे. एखाद्या कार्यालयात भ्रष्टाचार झाल्यास त्या विषयी सर्व कागदपत्रे माहिती अधिकाराद्वारे सहज प्राप्त करु शकतो. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात भ्रष्टाचाराला आळा बसला आहे.

## • माहिती अधिकाराचे महत्त्व :-

## १) प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ :-

माहिती अधिकाराच्या कायद्यामुळे प्रशासनातील भ्रष्टाचार, बेजबाबदारपणा, आरेरावीची वृत्ती अनियमीतता, पक्षपातीपणा इ. दोष कमी होऊन प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ झाली आहे. माहिती अधिकार कायद्याच्या पूर्वी अधिकाऱ्याकडून नागरीकांना आवश्यक असलेली माहिती वेळेच्या आत पुरवीली जात आहे. आणि प्रत्येकजण आपल्या कर्तव्याचे पालन करत आहे. त्यामुळे प्रशासनाची कार्यक्षमता वाढलेली आहे.

## २) लोकशाही अधिक मजबुत झाली :-

माहिती अधिकारामुळे लोकशाहीमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेल्या प्रत्येक नागरीकाला प्रशासनातील आवश्यक असलेली माहिती व आकडेवारी सहज प्राप्त करता येत आहे. माहिती अधिकारामुळे स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या लोकशाहीवादी मुल्यांना पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरीक आपल्या अधिकाराबाबत जागरुक झाला असून लोकशाहीचा पाया भक्कम व मजबूत बनविण्यास मदत मिळाली आहे.

**३) प्रशासकीय जबाबदारी व उतरदायीत्त्व वाढ :-**

माहिती अधिकारामुळे प्रत्येक प्रशासकीय कार्यालयातील विविध प्रशासकीय कामे कायद्यानुसार करणे भाग पडत आहे. जर एखादया अधिकाऱ्याने आपली जबाबदारी पार पाडली नाही तर ती बाब माहिती अधिकाराद्वारे उघड झाल्यास संबंधीतावर कार्यवाही केली जाते. या भितीपोटी प्रत्येक अधिकारी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडीत आहेत.

**४) जागरुक समाजनिर्मितीसाठी आवश्यक :-**

माहिती अधिकारामुळे सर्वसामान्य नागरीक आपल्या हक्काविषयी जागरुक झाला आहे. कोणत्याही नागरिकास जोपर्यंत आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होत नाही तोपर्यंत आपल्या हक्काचे महत्त्व कळत नाही. माहिती अधिकाराच्या माध्यमातून नागरीकांना विविध प्रशासकीय बाबींची माहिती सहजपणे होऊ लागली आहे. प्रत्येक नागरीक प्रशासनाकडून अन्याय झाल्यास माहिती अधिकाराद्वारे सत्य माहिती प्राप्त करुन घेत आहेत.

**५) माहिती देणे बंधनकारक :-**

जेव्हा एखादा नागरीक माहिती अधिकाऱ्याकडे माहिती प्राप्त करण्याचा अर्ज करतो तेव्हा नागरीकांनी मागीतलेली माहिती ३० दिवसाच्या आत लिखीत स्वरुपात देण्याचे बंधन संबंधीत अधिकाऱ्यावर असते तर ठरावीक मुदतीच्या आत माहिती दिली नसेल तर प्रतिदिवसाला २५० रुपये दंड संबंधीत अधिकाऱ्याला द्यावा लागतो. त्यामुळे माहिती अधिकाराची अमलबजावणी अधिकारी वर्गाकडून व्यवस्थीतपणे केली जात आहे.

**६) नागरीकांना माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी :-**

नागरीक जेंव्हा एखादे प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी प्रशासकीय कार्यालयात प्रस्ताव सादर करतो किंवा शासनाकडे एखादे निवेदन पाठवतो त्यावर प्रशासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे? याची माहिती माहितीच्या अधिकाराद्वारे प्राप्त करता येते तसेच प्रशासकीय कार्यालयातील आपल्याला आवश्यक असणारी माहिती कमी खर्चात मिळवीता येते. एखाद्या संशोधकाला संशोधन करण्यासाठी जी माहिती आवश्यक आहे ती या कायद्याच्या आधारे प्राप्त करता येत आहे.

**७) सुशासनाची स्थापना करण्यासाठी :-**

उदारीकरण, जागतीकिकरण आणि खाजगीकरणाच्या धोरणाचा स्विकार केल्यानंतर जगभरातील प्रशासन यंत्रणेत सकारात्मक परीवर्तन घडून आले आहे. प्रशासनाने जनतेला जास्तीतजास्त चांगल्या सुविधा कमी खर्चात, कमी वेळेत व कमी श्रमात उपलब्ध करुन द्यावेत तसेच इंटरनेट व इलेक्ट्रानीक साधनसामुग्रीच्या सहाय्याने कार्यक्षमता वाढावी हा विचार पुढे आला. यातुनच शासन कोणती कामे करीत आहे? व कोणत्या कामासाठी किती खर्च होत आहे? याची माहिती नागरीकांना प्राप्त करुन घेता यावी म्हणून माहिती अधिकार कायदा संमत करण्यात आला. वर्तमान काळात माहिती अधिकाराचे दिवसेंदिवस महत्त्व वाढत आहे.

● **भारतातील माहिती अधिकारापुढील अव्हाने :–**

**१) परस्पराबद्दल अविश्वास :–**

एखादा नागरीक जेंव्हा माहिती प्राप्त करण्यासाठी कार्यालयात माहिती अधिकाराचा अर्ज करतो तेव्हा अधिकारी व संबंधीत नागरिक यांच्यात अविश्वासाची भावना निर्माण होत आहे. इतकेच नव्हे तर माहिती अधिकाराचा अर्ज करणाऱ्या व्यक्ती बाबत द्वेषाची भावना निर्माण होत आहे. तर कांही ठिकाणी वाद निर्माण होत आहे.

**२) कायद्याच्या वापरा विषयी लोकांमध्ये अज्ञान :–**

समाजातील ज्या लोकांना या अधिकाराविषयी थोडीफार माहिती आहे. त्यांना या कायद्याच्या वापराविषयी फारसे ज्ञान नाही. एखाादी माहिती प्राप्त करायची असेल तर अर्ज कसा करावा? किती रुपयाचा कोर्ट फीस स्टॅम्प लावावा लागतो ? अधिकाऱ्याने ठरावीक मुदतीत माहिती न दिल्यास अधिकाऱ्याला आपण दंड लावू शकतो? या विषयीचे पुरेसे ज्ञान नागरीकांना नसल्यामुळे माहिती अधिकाराचे वापर करण्याचे प्रमाण किंवा संख्या विशेषत: ग्रामीण भागात खूप कमी आहे.

**३) ग्रामीण भागामध्ये अत्यल्प प्रसार :–**

ग्रामीण समाजामध्ये बहुसंख्य नागरीकांना माहिती अधिकार कायद्याचे ज्ञान नाही. आज ग्रामीण भागातील ७५ टक्के लोकांना माहितीचा अधिकार म्हणजे काय? याची माहिती नाही. त्यामुळे ग्रामीण समाजामध्ये आकाशवाणी, दुरदर्शन, पथनाट्य व पोस्टरच्या माध्यमातून या कायद्याचा प्रसार होणे आवश्यक आहे. प्रायोगीक तत्त्वावर एका संशोधकाने (एम.फील) पदवीसाठी एका तालुक्यातील २० गावातील नागरिकांचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास केल्यास ७३ टक्के नागरिकांनी या कायद्याची माहिती नसल्याचे नमूद केले आहे.

**४) कार्यालयीन नोंदीचा अभाव :–**

बहुतांश शासकीय कार्यालयामध्ये रेकॉर्ड सुव्यवस्थीत व सुरक्षीत ठेवण्यात आलेला नसल्यामुळे माहितीअधिकाऱ्याला उत्तरे देतांना अनेक अडचणी येत आहेत. वर्तमानकाळात महत्त्वपूर्ण कागदपत्राचे स्कॅनींग करुन रेकॉर्ड सुरक्षीत ठेवला जात असला तरी १९५०–७० दरम्यानचा रेकॉर्ड बहुतांश कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे माहिती अधिकारावर मर्यादा येत आहेत.

**५) प्रशासनाचा वेळ वाया जात आहे :–**

माहिती अधिकाराच्या अर्जाची वाढती संख्या लक्षात घेता अधिकारी वर्गाला दैनंदिन कामे करण्यास वेळ अपुरा पडत आहे. माहिती अधिकाऱ्याला उत्तरे ठरावीक कालावधीमध्ये देणे बंधनकारक असल्यामुळे अन्य महत्त्वाचे कामे सोडून उत्तर देण्यातच वेळ जास्त चालला आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारावर संशोधन करुन त्यावर कांही बंधने घालणे आवश्यक आहे.

### ६) माहिती अधिकाराचा गैरवापर :-

भारतीय समाजामध्ये माहिती अधिकाराचा कांही लोकांकडून गैरवापर करण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. कांही लोकांसाठी तर माहिती अधिकार हा पैसा कमविण्याचे एक साधन बनले आहे. एखाद्या प्रशासकीय कार्यालयाकडे माहिती अधिकाराचा अर्ज करायचा आणि कांही अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना मानसीक त्रास दयायचा या उद्देशाने ब्लॅकमेल केले जात आहे. माहिती अधिकाराच्या वाढत्या अर्जामुळे अधिकारी कर्मचारी वर्गाचा कामाचा व्याप वाढला आहे.

### ७) अधिकऱ्याचा नकारात्मक दृष्टीकोन :-

माहितीचा अधिकार कायदा हा लोकशाहीचा पाया मजबूत बनविणारा कायदा असला तरी पारंपारिक विचारानुसार काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा या बाबत नकारात्मक दृष्टीकोन दिसून येतो, कांही अधिकारी माहिती देण्याबाबत टाळटाळ करतात. तर कांही अत्यल्प स्वरुपाची किंवा त्रोटक स्वरुपाची माहिती नागरीकांस देतात. त्यामुळे अधिकाऱ्याच्या नकारात्मक दृष्टीकोनात बदल करण्याची आवश्यकता आहे.

थोडक्यात माहिती अधिकाराचा कायदा हा लोकशाहीत्मक वातावरण निर्माण व्हावे, भ्रष्टाचाराला आळा बसावा, प्रशासनाची कार्यक्षमता वाढावी, प्रशासन स्वच्छ व पारदर्शक बनावे, आणि लोकांची कामे सहजरीतीने पूर्ण व्हावेत या उद्देशाने माहिती अधिकाराचा कायदा संमत करण्यात आला या कायद्यामुळे प्रशासनावर जनतेची एकपृकारची पक्कड बसली असून भ्रष्टाचाराचे प्रमाण निश्चितच कमी झाले आहे. बेजबाबदार अधिकाऱ्यांना कर्तव्यपालन करण्यास भाग पाडले जात आहे. सर्वसामान्य नागरीकांची प्रशासकीय कामे वारंवार टाळली जात असतील तर सत्य माहिती नागरीकांना प्राप्त करता येऊ लागली आहे. परंतु समाजातील कांही मुठभर लोकांकडून स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी या कायद्याचा दुरुपयोग केला जात आहे. तर कांही अधिकाऱ्यांना माहितीचा अधिकार ही एक डोके-दुखीची बाब बनली आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारावर संशोधन करुन त्याचा गैरवापर टाळण्यासाठी आणि चांगल्या हेतूने माहितीच्या अधिकाराचा उपयोग होण्यासाठी त्यात सुधारणा करणे आवश्यक बनले आहे.

### संदर्भ ग्रंथ :-


१) डॉ.बिरकेश्वर प्रसाद, लोकप्रशासन ज्ञानदा प्रकाशन नवी दिल्ली.

२) एम.लक्ष्मीकांत – लोकप्रशासन.

३) भारत का राजपत्र भाग १२ अनुभाग १ प्राधिकार से प्रकाशित.

४) प्रा.डॉ.प्रिती पोहेकर – लोकप्रशासन.

५) डॉ.सुरेंद्र कटारिया – भारतीय प्रशासन.

६) फडके य.दी.माहितीचा अधिकारी-२.

७) दुबे अशोककुमार, २१ वी शताब्दी में लोकप्रशासन, टाटा मॅग्राहिल पब्लीशिंग कंपनी लिमिटेड न्यू दिल्ली.

८) डॉ.पंचशील एकंबेकर, प्रा.दिपक वाघमारे, प्रा.विजय तरोडे – लोकप्रशासनातील नव-प्रवाह.